चितळसर पोलीस ठाणे, ठाणे शहर
कार्यालय पत्ता : दोस्ती एमएमआरडीए बिल्डींग नं.५, १ ला माळा, दोस्ती इम्पेरीया बिल्डींगचे बाजुला, घोडबंदर रोड, मानपाडा, ठाणे (प.) महाराष्ट्र– ४००६१०
ईमेल आयडी– cp.thane.chitalsarm@mahapolice.gov.in
कार्यालय फोन नंबर : ०२२/२५८९९०७९

प्रेस नोट

चितळसर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ४६५/२०२६ भान्यासं कलम १३७(२) मधील अपहरित चार महिण्याच्या बाळाचा १० तासाच्या आत शोध घेतलेबाबत.

———————————————————————————————

चितळसर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ४६५/२०२६ भान्यासं कलम १३७(२) मधील फिर्यादी श्री छोगालाल मांगीलाल वागरिया, वय २७ वर्षे, व्यवसाय – झाडु विक्री, राह. माजिवाडा ब्रिजखाली, पेट्रोल पंपासमोर, ठाणे प. मुळ पत्ता हनुमान चौक, मोडी, उदयपुर, राजस्थान ३१३६०२ मो नं ७३००१२६७५७ यांनी दिनांक ०७/११/२०२६ रोजी सकाळी चितळसर पोलीस स्टेशन येथे येवुन त्याचे ४ महिन्यांची मुलगी .....हिस दिनांक ०७/११/२०२६ रोजी सकाळी ५:०० ते ०७:०० वाजेचे सुमारास माजिवाडा ब्रिजखाली पेट्रोल पंपासमोर ठाणे प. येथुन कोणीतरी अज्ञात इसमाने तक्रारदार यांच्या संमतीशिवाय त्यांचे कायदेशीर रखवालीतुन पळवुन नेले म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्ह्याचे गांभीर्य ओळखुन चितळसर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सुनिल वरुडे यांनी सदरची माहिती सहायक पोलीस आयुक्त श्रीमती ममता डिसोजा व पोलीस उपायुक्त श्री प्रशांत कदम यांना दिली. त्यानुसार मा. पोलीस उप आयुक्त श्री प्रशांत कदम यांनी परिमंडळ ५ मधील सर्व पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटिकरण पथकास सुचना देवुन पळवुन नेलेल्या बाळाचा शोध घेणेकामी ५ पथके रवाना केली.

त्यानुसार सदर पथकांनी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार घटनास्थळाच्या परिसरात गोपनिय व तांत्रिकदृष्ट्या तपास करुन कापुरबावडी परिसर, ठाणे रेल्वे स्टेशन परीसर, कळवा परिसर या ठिकाणी शोध घेतला असता यातील अपहरित बाळ .....वय ४ महिने हे आरोपीत महिला नामे कमल दत्तु मोरे वय ५२ वर्षे धंदा – भंगार वेचणे, राह. सार्वजनिक बाथरुमचे बाजुला, सायबा नगर, कळवा हिच्या ताब्यात मिळुन आले. सदरचे बाळ सुखरुपपणे तिचे आईचे ताब्यात देण्यात आले आहे.

नमुद तपास मा. पोलीस आयुक्त ठाणे शहर, श्री. आशुतोष डुंबरे, मा. पोलीस सह आयुक्त श्री. ज्ञानेश्वर चव्हाण, मा. अप्पर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, श्री. अशोक दुधे, मा. पोलीस उप आयुक्त परि–५ श्री प्रशांत कदम, सहायक पोलीस आयुक्त श्रीमती ममता डिसोजा, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुनिल वरुडे, यांचे मार्गदर्शनाखाली श्रीमती अनुजा घाडगे, पोनि (गुन्हे), सपोनि/श्री शिवाजी पाटील, पोउपनि/श्री विठ्ठल चितामण, पोउपनि/श्री नितीन हांगे, पोउपनि/रुपेश नरे, पोउपनि/पंकज लहाने, पोउपनि/अतुल जगताप, परिमंडळ ५ मधील तपास पथकाचे अंमलदार यांनी केलेला आहे.